**प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे साक्षीदार क्र.०३ यांचा सरतपास.**
देवाची शपथ खरे सांगतो
नाव -अशोक माणिकराव नाकाडे.

**प्रतिवादी तर्फे वकील श्री एन.एस.इंगळे यांच्या मार्फत सरतपास शपथेवर सुरू.**

माझे शपथपत्र नि.क्र.५४ मधील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे.

**६.** मी हरिदास वंजारी यांना ओळखत होतो. तसेच मी महेश मुनेश्वर वंजारी व मुनेश्वर हरिदास वंजारी यांना ओळखतो. हरिदास वंजारी हे मुनेश्वर यांचे वडील व महेश वंजारीचे आजोबा लागत होते. हरिदास वंजारी यांनी महेश वंजारी यांच्या नावाने बक्षीसपत्र करून दिले होते. सदर बक्षीसपत्र हे किनाळा ता. उमरेड येथील शेतजमीनीचे होते. सदर शेतजमीनीचा गट क्र. हा २२ व आराजी १.८६ हे.आर होती. सदर बक्षीसपत्र मला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला दि.१६.१२.२०१७ रोजीचे हरिदास वंजारी यांनी त्यांचा नातु महेश वंजारी यांच्या नावावर करून दिलेले बक्षीसपत्र दाखविण्यात आले, त्यावर साक्षीदार म्हणुन माझी सही आहे, तसेच दुसरे साक्षीदार म्हणुन शैलेश भिकाजी शंभरकर यांची सही आहे, तसेच लिहून देणार म्हणुन हरिदास गणेश वंजारी यांची सही आहे व बक्षिसपत्र लिहून घेणार म्हणुन महेश वंजारी व महेश वंजारी यांचा अज्ञान पालनकर्ता म्हणून मुनेश्वर वंजारी यांचे नाव व सही आहे. सदर बक्षीसपत्रावर हरिदास गणेश वंजारी, मुनेश्वर हरिदास वंजारी, अशोक माणिकराव नाकाडे म्हणजे मी व दुसरे साक्षीदार शैलेश भिकाजी शंभरकर इ. लोकांचे फोटो व त्यांच्या आंगठ्याच्या निशानी आहेत. सदर बक्षिसपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.५५** देण्यात आला.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास वादीतर्फे वकील श्री.बी.एस.मणे यांच्या तोंडी विनंतीवरून तहकूब करण्यात आला.**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड
दि.०२.०४.२०२६

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि.न्या.,क.स्तर,उमरेड